ISSN 2349-1027

International Registered and Recognized
Research Journal Related to Higher Education for all Subjects

# INDO WESTERN RESEARCHERS

(UGC Approved,Refereed & Peer Reviewed Research Journal)

Year -X, Issue - XX, Vol. - II | Impact Factor 6.50 (GRIFI) | Feb. 2024 To July 2024

भारतीय दार्शनिक अनुसंधान परिषद (ICPR) दिल्ली द्वारा प्रायोजित

आणि

शांतारामभाऊ घोलप कला, विज्ञान व गोटीरामभाऊ पवार वाणिज्य महाविद्यालय
शिवळे तत्त्वज्ञान विभाग द्वारा आयोजित

दोन दिवशीय राष्ट्रीय चर्चासत्र

दिनांक ०१ ते ०२ मार्च २०२४

# महात्मा फुले आणि समकालीन विचारवंताचे तत्त्वज्ञानातील योगदान



संपादक

डॉ. गीता विशे (प्रभारी प्राचार्य)

डॉ. सुनिलदत्त गवरे (तत्त्वज्ञान विभाग प्रमुख)

# INDEX


| Sr. No | Title for Research Paper | Page No |
|---|---|---|
| 1 | Maharshi Dayanand Saraswati's Views on Râja Dharma<br>**Dr. Kokila Kalekar** | 1 |
| 2 | डॉ. अम्बेडकर का जाति-अर्थशास्त्र विषयक एक आलोचनात्मक चिंतन<br>**डॉ. अमन बगाडे** | 8 |
| 3 | स्वामी विवेकानंद : शिक्षणआणिग्रंथालय विषयक दृष्टिकोन<br>**डॉ. दिलीप गोविंदा पाटील** | 14 |
| 4 | बाबा आमटे यांची आनंदवनाची संकल्पना<br>**डॉ. वेदप्रकाश डोणगावकर** | 19 |
| 5 | संत गाडगे महाराजांचे सामाजिक तत्त्वज्ञान<br>**डॉ. प्रभाकर रामलिंग किर्तनकार** | 25 |
| 6 | "नैतिकता हा बौध्द धम्माचा सार होय" डॉ. भिमराव आंबेडकर<br>**रंजना मलकप्पा प्रसन्ना** | 28 |
| 7 | सावित्रीबाई फुले यांचे शैक्षणिक तत्वज्ञान<br>**डॉ. विजय सोपानराव शेडगे** | 33 |
| 8 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणिक तत्वज्ञान आणि ग्रंथालय विषयक दृष्टिकोन<br>**डॉ. दिलीप गोविंदा पाटील, रामकिसन आश्रू मोरे** | 38 |
| 9 | एम. एन. रॉय - तत्वचिंतक ते क्रांतिकारक<br>**डॉ. स्वाती बापूराव भोंगळे** | 42 |
| 10 | अहिंसक सविनय कायदेभंगाचे समर्थन : महात्मा गांधीजी व मार्टिन ल्यूथर किंग<br>**डॉ. संतोष गायकवाड** | 45 |
| 11 | ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले<br>**डॉ. अनिल बळीराम बांगर** | 48 |
| 12 | अरविंद घोष यांचे शैक्षणिक विचार<br>**डॉ. धनराज सुभाष हाडुळे** | 54 |
| 13 | महात्मा गांधीचे जीवन विषयक तत्वज्ञान<br>**डॉ. अनिल नारायण पाटील** | 57 |

IMPACT FACTOR 6.50
ISSN 2349-1027
Indo Western Researchers (IWR)
Issue : XX, Vol. II
Feb. 2024 to July 2024
www.irasg.com

Research Paper 11 Philosophy

# ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले

**डॉ. अनिल बळीराम बांगर**
मराठी विभाग प्रमुख,
को.ए.सो. लक्ष्मी-शालिनी महिला महाविद्यालय,
पेझारी, ता. अलिबाग, जि. रायगड

**प्रस्तावना :**

भारतात आधुनिक काळात अनेक समाजसुधारक होऊन गेले. या समाजसुधारकांनी सामाजिक सुधारणा करण्यासाठी समाजातल्या मूळ समस्यांचा शोध घेतला असता त्यांच्या असे लक्षात आले की, स्त्री सुधारणा झाल्याशिवाय समाजसुधारणा होणार नाही. समाजामध्ये स्त्रीचे असलेले दुय्यम स्थान लक्षात घेऊन स्त्री सुधारणेवर भर दिला गेला. त्यामध्ये राजा राममोहन रॉय, महर्षी दयानंद सरस्वती यांनी पुढाकार घेतला. राजा राममोहन रॉय यांनी सतीच्या चालीला प्रकट विरोध केला व बहुपत्नीत्वाला देखील विरोध केला. महर्षी दयानंद यांनी स्त्रीशिक्षणावर भर दिला. बालविवाह, बालजरठ विवाह, स्त्रीदास्य यांसारख्या प्रथांना विरोध करून समाजात नवक्रांती घडवून आणण्याचा प्रयत्न केला.

आधुनिक भारताचे शिल्पकार म्हणून ज्यांचा उल्लेख केला जातो, असे थोर समाजसुधारक महात्मा जोतिबा फुले हे होय. म.फुलेंनी स्वातंर्त्य, समता, बंधुभाव या तत्त्वत्रयींवर निष्ठा ठेवून स्त्री-मुक्तीचे महान कार्य केले आहे. समाजसुधारण्यासाठी स्त्रीसुधारणा महत्त्वाची असल्याने त्यांनी स्त्रीशिक्षणावर भर दिला. यासाठी त्यांनी स्त्रीशिक्षणाची मोठी चळवळ उभी केली. सामाजिक सुधारणा करायची असेल तर स्त्रीशिक्षणाशिवाय पर्याय नाही. परंपरेच्या विरोधात बंड पुकारत त्यांनी १८५१ साली पुणे येथे मुलींची पहिली शाळा सुरू केली. आपली पत्नी सावित्रीबाई यांना शिकवले, त्यांना शिक्षिका बनवले. सावित्रीबाई भारतातील पहिली शिक्षिका म्हणून आज ओळखल्या जातात.

भारतील स्त्रियांच्या दृष्टीने अंधारयुग असणाऱ्या काळात सावित्रीबाई फुले यांनी केलेले शैक्षणिक व सामाजिक कार्य म्हणूनच महत्त्वपूर्ण ठरते. पहिल्या स्त्री-शिक्षिका, मुख्याध्यापिका, स्त्रीशिक्षणाच्या आद्य प्रणेत्या, स्त्री मुक्ती आंदोलनाच्या प्रणेत्या, दीन-दलित, अनाथांच्या माता अशा अनेक प्रकारे सावित्रीबाईंचे कार्यकर्तृत्व सिद्ध झाले आहे.त्यांचे शैक्षणिक आणि सामाजिक कार्य हे क्रांतिकारी असल्याने सावित्रीबाईंना 'क्रांतिज्योती'ही पदवी प्राप्त झाली आहे.

**सावित्रीबाई जोतीबा फुले जीवनपट :**

सावित्रीबाईंचा जन्म दिनांक ३ जानेवारी १८३१ रोजी सातारा जिल्ह्यातील नायगाव या गावी झाला. खंडोजी नेवसे आणि लक्ष्मी नेवसे हे सावित्रीबाईंचे माता-

पिता होत. तत्कालीन जनरीतीला अनुसरून वयाच्या नवव्या वर्षी तेरा वर्षांच्या जोतीबा फुले यांच्याबरोबर त्यांचा विवाह झाला. लग्नानंतर एका वर्षाच्या आतच सावित्रीबाईंच्या शिक्षणाची सुरुवात झाली. अर्थात मिशनरींच्या साह्याने स्वतःशिक्षण घेणाऱ्या जोतिरांवानी यात पुढाकार घेतला. उभयतांचे सहजीवन जवळपास पन्नास वर्षांचे आहे.बालवयापासून पती-पत्नीच्या नात्याने जवळ आलेले सावित्री व जोतीबा खऱ्या अर्थाने सहचर होते. एकमेकांच्या सहवासात निश्चित केलेल्या कार्याला गती येत असल्याने त्यांचे परस्परपूरकत्वही येथे अधोरेखित होते. सावित्रीबाईनी औपचारिकदृष्ट्या म्हणजेच इयत्तांप्रमाणे शिक्षण घेतल्याची नोंद नाही. मात्र, शिक्षक होण्यासाठीची पात्रता समजले जाणारे ट्रेनिंग त्यांनी घेतले होते. अर्थात याकामीही ब्रिटिश मिशनरींचा मदतीचा हात होता.

तत्कालीन सामाजिक परिस्थितीत स्त्री हा समाजातील महत्त्वाचा घटक दुय्यम म्हणून वागविला जात असे.उच्चवर्णीय स्त्रियाही याला अपवाद नव्हत्या. अशा प्रतिकूल परिस्थितीत सावित्रीबाईंचे स्वतः शिकणे आणि इतरांना शिकविणे हे क्रांतिकार्यच होते. सन १८४८ ते १८५२ या कालावधीत फुले दांपत्याने पुणे आणि शेजारील ग्रामीण परिसरात एकूण १८ शाळा काढल्या आणि त्या यशस्वीपणे चालविल्याही. या कार्यामुळेच त्या भारतातील पहिल्या शिक्षिका ठरतात. शिक्षणाच्या माध्यमातून दीनदलितांसाठी सतत कार्यमग्न राहणाऱ्या सावित्रीबाईंनी म.फुल्यांच्या बरोबर अनेकविध प्रकारचे सामाजिक कार्य केले आहे. दुष्काळात अन्नछत्र चालविणे, समाजप्रबोधनासाठी लेखन व भाषणे देणे, बालहत्या प्रतिबंधक गृह चालविणे, शेतकरी व मजूर स्त्री-पुरुषांसाठी रात्रशाळा व अध्यापन कार्य करणे,अनाथ बालकाश्रम चालविणे, जोतीबांच्या भाषणांचे संपादन करणे यांसारख्या विविध प्रकारच्या कामांमध्ये सावित्रीबाई कार्यमग्न राहिल्या. सरतेशवेटी त्यांचा मृत्यूही कर्मभूमीतच झाला. प्लेग झालेल्या एका मुलाला त्यांनी उचलून दवाखान्यात नेले. त्यातच त्यांनाही प्लेगचा संसर्ग होऊन दि. १० मार्च १८९७ रोजी त्यांचे निधन झाले.

**सावित्रीबाईंची वाङ्मयीन जडणघडण :**

सावित्रीबाई फुले यांनी जोतीरावांच्या प्रेरणेने शिक्षण घेऊन आपल्या सामाजिक कार्याला सुरुवात केली. शैक्षणिक व सामाजिक कार्य करीत असतानाच साहित्यरचना देखील केल्या आहेत. सावित्रीबाईंनी स्वानुभवातून गद्य व पद्यलेखन केले आहे. दीनदलित स्त्री-शूद्रासाठी कार्य करीत असताना समाजाला भेडसावणाऱ्या समस्यांवर आपल्या साहित्यरचनेतून प्रकाश टाकला आहे. जोतीरावांशी होत असलेल्या वैचारिक देवाणघेवाणीतून सावित्रीबाईंच्या व्यक्तिमत्त्वातील प्रगल्भता वाढत होती. त्यामुळेच सावित्रीबाईंनी समाजक्रांतीसाठी तत्कालीन रूढी व विचार यावर मात करून स्वतंत्रता, समानता व बंधुता या मूल्यवान जीवनतत्त्वांची मानवी हक्कांची जाणीव समाजात रुजवली.सावित्रीबाई या प्रगल्भ, समृद्ध व मव्योदात अशा व्यक्तिमत्त्वाच्या होत्या. स्वत्वसंपन्न व सृजनशील साहित्यनिर्मिती करून त्यांनी आपले मराठी साहित्यातले स्थान निश्चित केले आहे.

सावित्रीबाई फुले या प्रतिभासंपन्न कवयित्री होत्या. वयाच्या तेविसाव्या वर्षीच त्यांनी 'काव्यफुले' (१८५४) काव्यसंग्रह लिहिला. स्फुटरचनांचा संग्रह लिहिला. 'बावन्नकशी सुबोध रत्नाकर'ही काव्यरचना लिहिली. याशिवाय शिवमाहिम्न स्तोत्र हे मराठीत ओवीबद्ध केले आहे. सावित्रीबाईंच्या आत्मकथनपर रचनांमध्ये 'माझी जन्मभूमी', 'संसाराची वाट', 'आमची आऊ'जोतिबांना नमस्कार',जोतिबांचा बोध व सावित्री-जोतिबा संवाद या रचनांचा समावेश आहे. सावित्रीबाई या स्वतंत्र व्यक्तिमत्वाच्या आणि कृतिशील कवयित्री आहेत.

म. जोतीराव फुले यांच्या पत्नी क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांनी शैक्षणिक आणि सामाजिक क्षेत्रात आपल्या पतीच्या खांद्यास खांदा लावून केलेले कांतिकार्य बारकाईने विचारात घेतल्यास एक चमत्कार वाटण्यासारखे आहे. एकोणिसाव्या शतकात, पुण्यासारख्या सनातन्यांच्या

बालेकिल्ल्यात प्रचंड विरोधाला न जुमानता, सावित्रीबाई सारख्या एका स्त्रीने भल्याभल्या जाणकारांना आणि मान्यवरांना दिपवून टाकण्यासारखे काम करावे, हे एक नवलच वाटणे स्वाभाविक होते. नाईलाजाने का असेना; जोतीराव फुले यांच्या क्रांतिकार्यापुढे काही तथाकथित साहित्यिकांना मान तुकविण्याशिवाय इलाज नव्हता. तथापी सावित्रीबाईंचे कार्य अद्याप काही जणांना खरे वाटत नाही. त्यांनी केलेल्या क्रांतिकार्याचे श्रेय त्यांना देणे त्यांच्या जीवावर येते. नायगांवसारख्या एका खेड्यात जन्मलेली, शेतकऱ्याची एक निरक्षर मुलगी, लग्नानंतर शिक्षण घेते; शिक्षिका बनते; मराठी, इंग्रजी व संस्कृत भाषा अवगत करते, व्यासंग वाढवून लोकशिक्षणासाठी गद्यपद्य रचना करते, समाजसेविका बनते, आणि फुल्यांच्या मृत्यूनंतर सत्यशोधक समाजाचे समर्थ नेतृत्व करते; हे ऐतिहासिक सत्य असूनसुध्दा कोत्या मनोवृत्तीच्या महाभागांना हे सर्व खोटे वाटते. एका पतिपरायण स्त्रीपेक्षा सावित्रीबाई मोठ्या असू शकत नाहीत, अशी काही जणांची कोल्हेकुई ऐकावयास मिळते.

एकोणिसाव्या शतकात या देशात स्त्रियांना जनावरांइतकीही किंमत नव्हती, देवाधर्माच्या नावाखाली भयाण-भीषण गुलामगिरीत भरडल्या जाणाऱ्या कालखंडात एक ज्योत आपले पती जोतीराव फुले याच्या दैदिप्यमान ज्योतीने प्रज्वलित होते; आणि जगातील सर्व स्त्री समाजाला आपल्या प्रज्वलित झालेल्या ज्योतीने प्रकाश दाखवते; असे हे अपवादात्मक आणि अलौकिक उदाहरण आहे. जोतीराव फुले यांनाही एक थोर समाजक्रांतिकारक म्हणून त्यांच्या हयातीतच नव्हे तर, त्यांच्या मृत्यूनंतरसुध्दा पूर्ण न्याय मिळू शकत नाही, अशी अवस्था आहे. ही जर जोतीरावांची अवस्था, तर सावित्रीबाईंना न्याय मिळणे किती कठीण आहे याची कल्पना येऊ शकेल.

थोर समाजसेविका, समाजसुधारक, शिक्षण तज्ज्ञ, पहिल्या शिक्षिका, महाराष्ट्रातील स्त्रियांच्या भाग्यविधात्या क्रांतिज्योती सावित्री जोतिबा फुले यांचा 'काव्यफुले' हा इ. स. १८५४ मध्ये प्रसिद्ध झालेला पहिला कवितासंग्रह असून यामध्ये एक्केचाळीस कविता आहेत. सावित्रीबाई फुले यांच्या वात्सल्यमय कवीमनाच्या सुंदर रूपाची ओळख 'काव्यफुले'मधून पटते. पहिलाच कवितासंग्रह असल्यामुळे सावित्रीबाई जोतिबा फुले यांच्या विचारांची आणि भावविश्वाची ओळख या कविता संग्रहातून प्रत्ययास येते. समाज शिक्षणाची उत्कट तळमळ असलेल्या सावित्रीबाई यांच्या या कविता प्राधान्याने शिक्षणाकडे वळणाऱ्या असून या कवितांमधून त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे अनेक पैलू समोर येतात. समाजातील बहुजनांना शिक्षणाची गरज आहे आणि ते त्यांनी आवर्जून घ्यावे ही आंतरिक तळमळ आत्यंतिक आहे. जोतिबांच्या कार्यात साथ देताना, शिक्षिका म्हणून कार्य करताना त्यांचे तत्संबंधी चिंतनच 'काव्यफुले' मधून अवतरलेले आहे. कर्त्या सुधारकांची ही कविता आहे, त्यामुळे पुस्तकी पांडित्यापेक्षा निरलस साधेपणाने व तितक्याच उत्स्फूर्ततेने येणारी, समाजोद्धाराच्या भावनेने ओथंबलेली कविता इथे भेटते.

१८९२ मध्ये बावनकाशी सुबोध रत्नाकर प्रकाशित केले आणि "जा, शिक्षण मिळवा" नावाची कविता देखील प्रकाशित केली, ज्यामध्ये त्यांनी वंचित लोकांना शिक्षण घेऊन स्वतःला मुक्त करण्यासाठी प्रोत्साहित केले. त्यांच्या अनुभवाचा आणि कामाचा परिणाम म्हणून त्या एक उत्कट स्त्रीवादी बनल्या. महिलांच्या हक्कांबाबत जागरुकता निर्माण करण्यासाठी त्यांनी महिला सेवा मंडळाची स्थापना केली. त्यांनी महिलांसाठी जातीय भेदभाव किंवा कोणत्याही प्रकारचा भेदभाव मुक्त असलेल्या मेळाव्याचे ठिकाण देखील बोलावले. याचे प्रतिक म्हणजे उपस्थित सर्व महिलांनी एकाच चटईवर बसायचे. त्या भ्रूणहत्या विरोधी कार्यकर्त्यासुद्धा होत्या. त्यांनी महिलासांठी निवारास्थान उघडले, जेथे ब्राह्मण विधवा त्यांच्या मुलांची सुरक्षितपणे प्रसूती करू शकत होत्या आणि त्यांची इच्छा असल्यास त्यांना दत्तक घेण्यासाठी तेथे सोडू शकतात. त्यांनी बालविवाहाविरुद्धही मोहीम चालवली आणि विधवा पुनर्विवाहाचे समर्थन केले. सावित्रीबाई आणि ज्योतिरावांनी

सतीप्रथेला कडाडून विरोध केला आणि त्यांनी विधवा आणि वंचित मुलांसाठी घर सुरू केले.

फुले दांपत्याने सुरू केलेल्या स्त्री शिक्षणाच्या कार्याला सनातनी व कर्मठ समाजाचा विरोध तीव्र स्वरूपाचा होता. शेतकऱ्याच्या साधारण कुटुंबात जन्मलेल्या सावित्रीबाई लग्नापर्यंत निरक्षरच होत्या. फुल्यांच्या सहवासात त्यांच्या शिक्षणाला सुरुवात होऊन ज्ञानार्जनाचे महत्त्वही त्यांना पटले, यामुळेच आवश्यकता निर्माण होताच मुलींच्या शाळेसाठी त्या स्वतः शिक्षिका बनल्या. त्यांच्या अंगी असलेल्या निर्भीडपणामुळे येणाऱ्या प्रत्येक संकटाचा त्यांनी धीराने सामना केला आणि लोकोद्धाराचे घेतलेले कार्य त्या करत राहिल्या. मूलतः शिक्षण प्रसाराच्या कामाविषयीची त्यांची भूमिकाच स्पष्ट होती. लोकांना केवळ साक्षर करावे, याकरिता त्या शिक्षण देण्याचे काम करत नव्हत्या, तर शिक्षणाच्या माध्यमातून त्यांना समाजजागृती घडवून आणायची होती. जुन्या रूढी-परंपरा,भोळ्या समजुती, अंधश्रद्धा यामुळे सामान्य जनता पशुवत जीवन जगत होती. त्यांचे मनुष्यत्व सिद्ध करण्यासाठी शिक्षण हे माध्यम असल्याचे त्या वेळोवेळी स्पष्ट करत. 'काव्यफुले' या संग्रहात त्या म्हणतात,

शूद्रांना सांगण्याजोगा शिक्षण मार्ग हा । शिक्षणाने
मनुष्यत्व, पशुत्व हटते पहा ॥[१]

थोडक्यात, समाजपरिवर्तनाचे साधन म्हणजे शिक्षण अशी त्यांची भूमिका होती. आजच्या काळाशीही सावित्रीबाईंचा हा विचार सुसंगत आहे. येथे सावित्रीबाईंचा द्रष्टेपणा लक्षात येतो. सुमारे दीडशे वर्षांपूर्वी शिक्षणविषयक व्यापक दृष्टिकोन मांडणाऱ्या सावित्रीबाई थोर शिक्षण तज्ज्ञच आहेत. तत्कालीन समाजजीवनात स्त्रियांसंदर्भात अनेक अमानवीय रूढी-परंपरा अस्तित्वात होत्या. बालविवाह, जरठविवाह या प्रथा सामाजिक प्रतिष्ठेच्या मानल्या जातअसत. विधवा स्त्रियांची परिस्थिती तर अतिभयानक म्हणावी अशीच होती. धर्माच्या नावाखाली बालविवाह केले जात. कित्येकदा बाला-जरठ विवाह होत, त्यामुळे कोवळ्या मुलींच्या पदरी वैधव्य येत असे. विधवा झाल्यानंतरचे जगणे मृत्यूपेक्षाही वाईट होऊन जाई. अशातच त्या विधवा नातेवाईकांच्याच वासनेच्या बळी ठरत. त्यातून निर्माण होणाऱ्या सामाजिक समस्या केवळ विधवेच्याच माथी मारल्या जात. घराण्याची बेअब्रू होऊ नये म्हणून मग विधवांवर अधिकाधिक जाचक, रूढी व परंपरा लादल्या जात. एकार्थाने त्यांचे नैसर्गिक जगणेच हिरावले जाई. केशवपन हे उच्चवर्णीय स्त्रियांच्याच बाबतीत घडत असे. बाह्यसौंदर्याबरोबरच तिच्या आत्मसन्मानाचेही हनन कर्मठ समाज खोट्या प्रतिष्ठेपायी करत असे. फुले दांपत्याने वाट चुकलेल्या (की, नैसर्गिक भावभावनांप्रमाणे माणूस म्हणून जगू पाहणाऱ्या) विधवांकरिता कर्मठ पुण्यात सन १८५३ साली बालहत्या प्रतिबंधक गृहाची स्थापना केली. स्वतः सावित्रीबाई येथे येणाऱ्या विधवांची बाळंतपणे करून आईच्या मायेने त्यांची काळजी घेत असत. धर्म व रूढींचा प्रभाव सर्व समाजावर पसरला असता तत्कालीन समजुतीनुसार अधर्म समजले गेलेले कार्य सावित्रीबाई मोठ्या धीटाईने करत असत. काळाच्या नव्हे शतकाच्या पुढे जाण्याची दृष्टी असणारी ही स्त्री खऱ्या अर्थाने क्रांतीची मशालच होती.

सावित्रीबाईंचे दोन काव्यसंग्रह काव्यफुले आणि बावन्नकशी सुबोध रत्नाकर हे आहेत. काव्यफुले हा संग्रह सन १८५४ साली शिळा प्रेसवर छापून प्रकाशित करण्यात आला आहे. आधुनिक मराठी वाङ्मयेतिहासाचा विचार करता या संग्रहाचे ऐतिहासिक महत्त्व विचारात घ्यावे लागते. याविषयी डॉ. मा. गो. माळी म्हणतात, 'सावित्रीबाईंचा पहिला काव्यसंग्रह ज्या काळात (इ. स. १८५४ मध्ये) प्रसिद्ध झाला; त्या काळात समकालीन अशी एकही कवयित्री झाल्याचे दिसून येत नाही. उपेक्षितांच्या जागरणांचा व समाजसुधारणेचा विषय समाविष्ट असलेली काव्यरचना या काळात केल्याचे उदाहरण महाराष्ट्र सारस्वतात सापडत नाही, त्यामुळे सावित्रीबाईंची काव्यरचना म्हणजे सामाजिक आणि साहित्यक्षेत्रातील क्रांतीच होय, हे मान्य करावे लागेल'.[२]

याशिवाय सावित्रीबाईंच्या कवितेतील काव्यविषयांचाही डॉ. माळी यांनी तपशीलवारपणे विचार केला आहे. आत्मपर कविता, निसर्गवर्णनपर कविता, सामाजिक जाणिवेची कविता या विषयांच्या आधारे आधुनिक मराठीकाव्याचे जनक म्हणून केशवसुतांना अधोरेखित केले जाते. हेच परिमाण सावित्रीबाईंच्या कवितेला लावल्यास त्यांना 'आधुनिक मराठी काव्याची जननी'[३] साधार मानता येते.

'काव्यफुले' तील सामाजिक आणि बोधपर कविता वैशिष्ट्यपूर्ण आहेत. यातून सावित्रीबाईंच्या विचारांची आणि अभिव्यक्तीची झेप आपल्या ध्यानात येते. आधुनिक शिक्षणाची सुरुवात करणाऱ्या इंग्रजांविषयी त्यांच्या मनात कृतज्ञता आहे, तर ज्ञानाची कवाडे सामान्यजनांना खुली करणाऱ्या इंग्रजी राज्याला त्या आंग्लाई असे संबोधन वापरतात. संत तुकाराम आणि कबीर यांच्या काव्याचाही त्यांच्या कवितेवर असणारा प्रभाव सहजपणे लक्षात येतो. सावित्रीबाईंचे द्रष्टेपण आणि स्वतंत्र विचारदृष्टी ठळकपणे अधोरेखित करणारी 'काव्यफुले' तील 'सामुदायिक संवाद पद्य' ही एक कविता महत्त्वाची आहे. या कवितेत मुलींचे पाच गट करून त्या प्रत्येक गटासाठी सावित्रीबाईंनी संवाद लिहिले आहेत. हा प्रयोग त्या शाळेतील विद्यार्थिनींसाठी करत असाव्यात. अर्थात, या संवादाच्या माध्यमातूनही त्या शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित करतात. खेळ, घरकाम की शाळा अशा द्वंद्वात सापडलेली मुलगी आईला विचारते यातले नेमके काय करू, या प्रश्नाचे उत्तर देताना सावित्रीबाई कवितेत लिहितात,

'अभिमानाने जगण्यासाठी शिकून घ्या ना शाळेला
मनुष्याचा खरा दागिना शिक्षण आहे घ्या चला
जा शाळेला, जा शाळेला
काम पहिलं शिकायचं आहे. दुसरं काम खेळ खेळा
जमेल तेव्हा झाडणं-पुसणं हात लावा घरकामाला
जा आधी जा शाळेला'[४]

या कवितेतून प्रकटणारे सावित्रीबाईंचे स्त्री शिक्षणविषयक विचार त्या काळाचा विचार करता थक्क करणारे आहेत. वास्तविक पाहता आजही मुलींच्या शिक्षणाच्या बाबतीत उदासीनता असलेली दिसून येते.

१९ व्या शतकात प्रतिकूल परिस्थितीतही शिक्षणाविषयीची सावित्रीबाईंची स्पष्ट भूमिका त्यांचा द्रष्टेपणा निर्विवादपणे अधोरेखित करते. सावित्रीबाईंचा दुसरा काव्यसंग्रह 'बावन्नकशी सुबोध रत्नाकर' हा सन १८९२ साली प्रसिद्ध झालेला आहे. या संग्रहातील कवितांचे उपोद्घात, सिद्धता, पेशवाई, आंग्लाई, जोतीबा आणि उपसंहार असे उपविभाग सावित्रीबाईंनी केले आहेत. या काव्यनिर्मितीचे प्रयोजन नेमके काय आहे, याची स्पष्टता उपोद्घात या भागात त्यांनी दिलेली आहे. जोतीबांमुळे आपण शिकलो, याची जाणीव असलेल्या कृतज्ञ सावित्रीबाई हे काव्यही त्यांनाच अर्पण करतात. या संग्रहाची रचना भुजंगप्रयात या वृत्तामध्ये करण्यात आली आहे. पुढे सिद्धता या उपशीर्षकांतर्गत सावित्रीबाई इंडिया चा मूळ इतिहास शोधू पाहतात. यामध्ये आर्य म्हणजे इराणी, तार्तर आणि हून असून येथील मूळवासींना जिंकून त्यांनी चातुर्वर्ण्यव्यवस्था निर्माण केली, हे काव्यात मांडले आहे. पेशवा मध्ये शूद्रांचा झालेला अनन्वित छळ त्या मांडतात. आंग्लाई या भागात इंग्रज आणि त्यांच्या सत्तेची स्त्री-शूद्रादी संदर्भातील उदार भूमिका सावित्रीबाईंनी शब्दबद्ध केली आहे. इंग्रजांविषयीचा कृतज्ञताभाव आणि आपुलकी आंग्लाई या उपशीर्षकातूनही जाणवते.

सावित्रीबाईंचे जीवन व कार्य पाहता काळाच्या अनेक शतके पुढे पाहू शकणारी स्त्री असा त्यांचा उल्लेख करावा लागतो. दुर्दैवाने आजही फुले दांपत्याचे कार्य आणि योगदान यथार्थपणे मान्य केले जात नाही. फुल्यांसह समाजसेवेच्या कार्यात हिरीरीने भाग घेणाऱ्या सावित्रीबाई त्यांच्या पश्चातही तितक्याच धडाडीने कार्यरत राहिल्या. प्रसंगी आप्तस्वकीयांशी बेबनावही झाला. एका विधवेचा मुलगा दत्तक घेऊन उक्तीप्रमाणे कृती करणारे फुले दांपत्य खऱ्या अर्थाने काळाच्या पुढे जाणारे होते. सावित्रीबाईंचा संयम आणि करारीपणा फुल्यांच्या

अंत्ययात्रेतही दिसून येतो. दत्तक मुलाच्या हातून अंतिम विधी करण्यावरून नातेवाईकांमध्ये वाद उभा राहिला. पती गेलेला असतानाही अत्यंत धीराने सावित्रीबाई स्वतः टिटवे घेऊन यशवंतासह अंत्ययात्रेत अग्रभागी राहिल्या. सावित्रीबाईंचे हे असामान्यपण दुर्लक्षित केले जाते. वास्तविक पाहता आज आणि इथून पुढेही निर्माण होणाऱ्या मानवमुक्तीच्या चळवळीच्या प्रेरणास्थानी फुले दांपत्याचे कार्यकर्तृत्व अपरिहार्यपणे असणारच आहे, हे लक्षात घ्यावे लागते.

**समारोप :**

सावित्रीबाईंची थोरवी त्यांच्या कार्यावरून लक्षात येते. सावित्रीबाई या थोर तळमळीच्या शिक्षिका होत्या. विलक्षण चिकाटीने आणि कठोरपणे त्यांनी ज्ञान देण्याचे कार्य केले. स्त्रियांवरील अन्यायाविरोधात त्या आयुष्यभर लढल्या. सावित्रीबाईंचे हे महान कार्य त्यांच्या शिक्षणातून मिळालेली प्रेरणा होय! म्हणून 'भगिनींनो, साक्षर व्हा आणि निर्भय व्हा-' हा संदेश क्रांतिज्योती सावित्रीबाई फुलेंचा! प्रस्थापितांविरोधी पाऊल उचलून, सनातनवाद्यांशी संघर्ष करून, स्त्रियांवरील अत्याचार, रुढी-परंपरेच्या दृढ शृंखला तोडण्याचे असीम धाडस दाखविणाऱ्या सावित्रीबाई फुले ह्या स्त्री मुक्तीच्या आद्य प्रणेत्या होत. सावित्रीबाई फुले यांच्या ठिकाणी द्रष्टेपण तर होतेच; पण स्त्री चळवळ परिवर्तनासाठीचा संघटित लढा विशिष्ट वर्गाच्याच हातात राहून त्यांची मिरासदारी वाढू नये हा जाणीवपूर्वक प्रयत्न त्यांनी केला. आज ओ. बी. सी. वर्गासाठी आणि स्त्रियांसाठी ज्या राखीव जागा ठेवण्याची शासनाची भूमिका आहे. त्यास सामाजिक मान्यता मिळावी यादृष्टीने विचारांचे बीज पेरण्याचे असामान्य कार्य त्यांनी केले. सावित्रीबाई फुले म्हणजे असामान्य त्याग, असीम निष्ठा, अपरिमित श्रद्धा, अखंड परिश्रम, अविचलपणे मूल्यांची जपणूक, अतुलनीय धाडस आणि अविरतपणे स्त्री, शूद्र, अतिशूद्रासाठी पुरोगामीपणाने झटणारे वंदनीय व्यक्तिमत्व होय.

## संदर्भ सूची :-


१) सावित्रीबाई फुले समग्र वाङ्मय, डॉ. मा. गो. माळी (संपा), महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मार्च १९९८, पृ. २५२

२) तत्रैव. पृ. ३९

३) तत्रैव पृ. ३८

४) काव्यफुले, ३९ सामुदायिक संवाद पद्य,तत्रैव.,पृ. ३१

५) समाजप्रबोधन पत्रिका, जुलै-डिसेंबर २००९

६) दलित कवयित्रींची कविता : स्वरूप आणि चिकित्सा, डॉ. जया विश्वनाथ पाटील, पद्मगंधा प्रकाशन पुणे, २५ डिसेंबर २०१४, पृ. ३८

७) सावित्रीबाई फुले समग्र वाङ्मय तत्रैव , पृ. ७४